# मैत्रीचे प्रतीक




प्राचीन ग्रीक गणितज्ञ पायथॅगोरस याने 'पायथॅगोरसचा समाज' नावाचा एक नवा समुदाय स्थापन केला होता. जगातील सर्व काही आकड्यांच्या साहाय्याने समजून घेता येईल व त्याचे स्पष्टीकरणही देता येईल असा या समुदायातील लोकांचा विश्वास होता.

220 आणि 284 हे दोन आकडे त्यांचे फार आवडते होते. 220 च्या अवयवांची (1 आणि 220 सोडून) बेरीज केली तर उत्तर येते 284.

आणि 284 च्या अवयवांची (1 व 284 सोडून) बेरीज केली तर मिळतात 220.

या दोघांमध्ये हे विलक्षण नाते असल्याने पायथॅगोरसने त्यांना मैत्रीपूर्ण आकडे (ॲमिकेबल नंबर्स) असे नाव दिले. ते मैत्रीचे प्रतीक मानले गेले.